खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (KEIPL) यांच्याकडून खेड डेव्हलपर्स लि.(KDL) या कंपनीस पोटभाडेपट्टयाद्वारे हस्तांतरीत होणाऱ्या क्षेत्राबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.मऔधो -२०१६/प्र.क्र. २०९/ उद्योग-२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०८मार्च, २०१९

<u>संदर्भ :-</u> १) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. मऔधो-२०१६/प्र.क्र. २०९/ उद्योग-२, दिनांक १५/०२/२०१८
२) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. मऔधो -२०१६/प्र.क्र. २०९/उद्योग-२, दिनांक ०५/०३/२०१८
३) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. मऔधो -२०१६/प्र.क्र. २०९/ उद्योग-२, दिनांक १७/१२/२०१८

<u>प्रस्तावना</u> :-

महाराष्ट्र औद्योगिक धोरण-२०१३ सोबतच्या "अनुसूची-अ" येथे दर्शविलेल्या "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" विकसित करण्यासंबंधी धोरणामध्ये सुधारणा करण्याबाबत दिनांक १४/०२/२०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सदर धोरणामध्ये सुधारणा करण्यासंबंधीचा शासन निर्णय दि. १५ फेब्रुवारी २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

२. खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (KEIPL) यांच्याकडून खेड डेव्हलपर्स लि. (KDL) या कंपनीस पोटभाडेपट्टयाद्वारे हस्तांतरीत होणाऱ्या १४९ हे. आर. क्षेत्राबाबत उपरोक्त नमूद दिनांक १५/०२/२०१८ च्या शासन निर्णयात अंशत: सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याविषयी दिनांक ०८/०३/२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र औद्योगिक धोरण -२०१३ सोबतच्या "अनुसूचि - अ" येथे दर्शविलेल्या "एकात्मिक औद्योगिक क्षेत्र" विकसित करण्यासंबंधी शासन निर्णय दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला होता.

सदर शासन निर्णयातील अनु.क्र. ३ खालीलप्रमाणे आहे :-

३. खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.(KEIPL) यांचेकडून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची कंपनी खेड डेव्हलपर्स लि. (KDL) यांना हस्तांतरीत होणाऱ्या १५% विकसित भूखंडाच्या क्षेत्रासाठी आकारल्या जाणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या रकमेस मुंबई मुद्रांक अधिनियम कलम (९) नुसार लोकहितास्तव माफी देण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद अनु.क्र. ३ खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-

३. खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.(KEIPL) यांचेकडून प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची कंपनी खेड डेव्हलपर्स लिमिटेड (KDL) यांना हस्तांतरीत होणाऱ्या १५% अविकसित भूखंडाच्या क्षेत्रासाठी आकारल्या जाणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या रकमेस मुंबई मुद्रांक अधिनियम कलम (९) नुसार लोकहितास्तव माफी देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर www.maharashtra.gov.in येथे उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०८१७३६४५२६१० आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Shamkant Degaonkar

Digitally signed by Sanjay Shamkant Degaonkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry, Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=de0a2ca7914a3c02f24aa23655f609f41f2d36b0ec57da4c71f19aaf08230a79, serialNumber=56cf8c8577584adc42f070185c585c41084cc34f6683553d21ccacbfa33d4d1f, cn=Sanjay Shamkant Degaonkar
Date: 2019.03.11 12:40:30 +05'30'

(संजय देगांवकर)

सह सचिव(उद्योग), महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
४. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
९. मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

१०. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
११. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
१३. अपर मुख्य सचिव, नियोजन, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव, नगर विकास (नवि-१), मंत्रालय, मुंबई
१५. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. विभागीय आयुक्त, पुणे विभाग.
१७. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत मुंबई
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
१९. जिल्हाधिकारी, पुणे
२०. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
२१. उद्योग सह संचालक विभाग, पुणे.
२२. महाव्यव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे
२३. खेड इकॉनॉमिक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., ४, अमर अविनाश कॉर्पोरेट प्लाझा, सर्व्हे नं. ११, ११/ ११/१ ते ११/४, प्लॉट नं. डी/२, बंड गार्डन रोड, पुणे-४०० ००१
२४. मेसर्स खेड डेव्हलपर्स लि., मुंडवा, पुणे कॅन्टोनमेंट, पुणे-३६
२५. निवड नस्ती (उद्योग-२)